## <u>परिशिष्ट ‘सी’</u>

## <u>' उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना'</u>

(१) प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी **<u>maha-agriadmission.in</u>** या संकेतस्थळावर **'Application Flow Chart'** या शिर्षाद्वारे दर्शविण्यात आलेल्या प्रवेश पध्दतीच्या टप्प्यांचे अवलोकन करावे.

(२) प्रवेश माहिती पुस्तिकेमधील मुद्दा क्र. १७ येथे नमूद करण्यात आलेल्या वेळापत्रकाचे नीट आकलन करावे.

(३) प्रवेश प्रक्रिया संपूर्णतः ऑनलाईन असल्याने **www.mcaer.org** किंवा **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर उमेदवाराने प्रवेश अर्जाद्वारे वैयक्तिक व शैक्षणिक माहिती भरावी.

(४) संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या मूळप्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात. मे. केटीपीएल, पुणे यांच्या अधिकृत केंद्रांवर एक कागदपत्र स्कॅन करण्यासाठी रू.५/- शुल्क आकारण्यात येईल. अशा अधिकृत केंद्रांची यादी **‘maha-agriadmission.in’** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(५) स्कॅन करून अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.

(६) **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्व उमेदवारांसाठी रु.२०००/- तर महाराष्ट्रातील आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१०००/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, डेबिट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड द्वारे भरावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था संकेतस्थळावर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

(७) उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावे.

(८) प्रवेश अर्जामधील माहिती योग्य असल्याची, त्याप्रमाणे कागदपत्रे अपलोड केल्याची व प्रवेश शुल्क भरल्याची खातरजमा झाल्यानंतरच प्रवेश अर्ज दाखल करण्याचे बटन दाबावे. एकवेळा दाखल झालेल्या प्रवेश अर्जामध्ये दुरस्त्या / सुधारणा करता येणार नाहीत. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

(९) (अ) अंतरिम गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर आपले नाव, प्रवर्ग, गुण, अधिभार इत्यादी माहिती अचूक आहे, याची संकेतस्थळाद्वारे खातरजमा करावी.

(ब) माहितीमध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्यास, पुराव्यादाखल कागदपत्राचे स्कॅन करून अशा स्कॅन कागदपत्रांसह वेळापत्रकात दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवाराने आपल्या 'लॉग-इन आय्डी' व 'पासवर्ड'च्या आधारे त्रुटीची ऑन लाईन पूर्तता करावी.

(१०) (अ) वेळापत्रकात नमूद केलेल्या दिनांकास प्रसिध्द केलेल्या महाविद्यालयनिहाय 'प्रवेश यादी'चे अवलोकन करावे.

(ब) **'वाटप यादी'मध्ये नाव असलेल्या उमेदवाराने आपल्या 'लॉग-इन आयडी'द्वारे 'तात्पुरते प्रवेश वाटपपत्र' (Provisional Allotment Letter) प्राप्त करून घ्यावे.**

**(११)** (अ) ज्या उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशा उमेदवारास प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याने संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व आवश्यक त्या शुल्कासह संबंधित महाविद्यालयामध्ये, वाटपपत्रावर **(Provisional Allotment Letter)** नमूद केलेल्या **अंतिम दिनांकापर्यंत विहित वेळेत उपस्थित रहावे.**

(ब) अशा उमेदवाराकडील आवश्यक ती मूळ कागदपत्रे महाविद्यालयाकडून तपासण्यात येतील व योग्य असल्यास उमेदवाराचा प्रवेश निश्चित करतील.

**(१२)** (अ) प्रवेश घ्यावयाचा असल्यास उमेदवाराने नियमानुसार शुल्क व आवश्यक ती मूळ कागदपत्रे महाविद्यालयात जमा करावीत.

**(ब) ज्या उमेदवारांना शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती होते, अशा उमेदवारांनी शुल्क भरु नये.**

(क) प्रवेश घ्यावयाचा नसल्यास, प्रवेश घ्यावयाचा नसल्यास, **संकेतस्थळावर उमेदवाराच्या लॉग-इनद्वारे डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकींगद्वारे रू.२००/- ऑनलाईन अदा करून प्रवेश नाकारता येईल.**

**(१३)** (अ) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर प्रवेश रद्द करावयाचा असल्यास संबंधित **महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यामध्ये प्रवेश रद्द करण्याबाबत विनंती अर्ज सादर करावा.**

(ब) अशाप्रकरणी **प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१८ नुसार आवश्यक ते शुल्क व मूळ कागदपत्रे महाविद्यालयाकडून परत घ्यावीत.**

(१४) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत त्यास

प्रवेश मिळू शकतो. मात्र उमेदवाराने अशाप्रसंगी एखाद्या व्यक्तीस स्वतःच्या स्वाक्षरीने प्राधिकृत करणे आवश्यक आहे. प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकार पत्रासोबत उमेदवाराचे तात्पुरते वाटपपत्र, उमेदवाराची सर्व मूळ कागदपत्रे, संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र आणि आवश्यक ते शुल्क सोबत आणावे. प्राधिकार पत्राचा विहित नमुना **परिशिष्ट <u>'ई'</u>** येथे देण्यात आला आहे. ही बाब, जागेवरील प्रवेश फेरीच्यावेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

**(१५)** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतांना मूळ कागदपत्रांच्या आधारे उमेदवारांने योग्य माहिती प्रवेश अर्जात द्यावी. चुकीची माहिती दिल्यास अशा चुकीच्या माहितीच्या आधारे झालेला प्रवेश रद्द करण्यात येईल.

**(१६)** ज्या विद्यार्थ्यांना स्वेच्छेने मरणोत्तर अवयव दान करावयाचे आहेत. त्यांनी परिशिष्ट **'आय'** येथील 'मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज' भरून महाविद्यालयाकडे द्यावा.

(१७) अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'बी' येथील नमुन्यात स्वघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड करणे अनिवार्य आहे.

(१८) शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण - १५१७ / प्र.क्र.१८५ / ६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाकडे जमा करावे.

-------------------